**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.**
दूरध्वनी : (कार्यालय) : ०२०-२५७१६१३३, २५७१६३०३ फॅक्स: ०२० - २५६५६०४६
ई-मेल आयडी : msbtssb@gmail.com Website:www.balbharati.in

# (सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी जाहिरात)

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे या कार्यालयात आस्थापनेवरील गट-ब संवर्गातील विहित केलेली शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून खालील नमूद केलेली रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक ३.७.२०१४ रोजी सकाळी ११.०० ते दिनांक १६.७.२०१४ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | पदनाम | विषय | पदांची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १. | विशेषाधिकारी | मराठी | ०१ | अनु.जमाती-०१, वि.जा.(अ)/ भ.ज.(क)- ०१, इमाव - ०१ |
| | | शास्त्र | ०१ | |
| | | गणित | ०१ | |
| २. | कार्यकारी संपादक (किशोर)-जनसंपर्क अधिकारी (एकाकी पद) | | ०१ | खुला (अनारक्षित) |

(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे ४११ ००४ यांच्या www.balbharati.in व www.msbtssb.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली तपशीलवार माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल. सदरच्या जाहिरातीचा व सूचनांचा उमेदवारांनी बारकाईने अभ्यास करावा व त्यानंतरच ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा.

(२) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या www.balbharati.in व www.msbtssb.in या संकेतस्थळावर जाहिरातीमधील नमूद पदांचे सामाजिक आरक्षण, भरती संदर्भातील ऑनलाइन अर्ज करण्याची कार्यपद्धती, अर्ज स्वीकृती कार्यपद्धती, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, अर्जाचे शुल्क इत्यादींबाबतचा सविस्तर तपशील दिलेला आहे.

(३) वरील पदांसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रक्कम रु.२००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी रक्कम रु.१००/- इतके शुल्क बँक ऑफ महाराष्ट्रच्या कोणत्याही शाखेत खाते क्रमांक २००६२२०४७७५ मध्ये संगणकीय चलनाद्वारे भरणे आवश्यक आहे. त्याकरिता बँक चलनाची प्रत उमेदवारांनी मंडळाच्या www.balbharati.in व www.msbtssb.in या संकेतस्थळावरून Download करून घ्यावी. तद्नंतर उमेदवाराने संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेनुसार Online अर्ज भरावा. व त्यासोबत सर्व आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत Upload करावीत. अर्ज Submit झाल्यावर त्याची प्रिंट काढावी. संगणकीय चलनाची मूळ प्रत उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र चलनाद्वारे शुल्क भरणे आवश्यक आहे. शुल्कामध्ये सवलत मिळण्याकरिता मागास प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या जातीच्या वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मागास वर्गातील उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र नसल्यास अथवा अर्जासोबत न जोडल्यास त्यांनी खुल्या प्रवर्गाप्रमाणे रक्कम रु.२००/- चे शुल्क भरावे. अर्जाच्या छाननीमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**क्रमांक : प-२२/सरळसेवा भरती/२०१४-१५/७९६**
दिनांक : १.७.२०१४
ठिकाण : बालभारती, पुणे ४.

संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.**
दूरध्वनी : (कार्यालय) : ०२०-२५७१६१३३, २५७१६३०३ फॅक्स: ०२० - २५६५६०४६
ई-मेल आयडी : msbtssb@gmail.com Website:www.balbharati.in

## (सरळसेवेने भरावयाच्या पदांसाठी जाहिरात)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे या कार्यालयात आस्थापनेवरील गट-ब संवर्गातील विहित केलेली शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून खालील नमूद केलेली रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक ३.७.२०१४ रोजी सकाळी ११.०० ते दिनांक १६.७.२०१४ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. (१) विशेषाधिकारी (मराठी, शास्त्र आणि गणित) (२) कार्यकारी संपादक (किशोर)-जनसंपर्क अधिकारी

| अ. क्र. | पदनाम/ पे-बँड व ग्रेड-वेतन | विषय | पदांची संख्या | वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १. | विशेषाधिकारी (१६०८०-५०६२० ग्रेड-पे. रु. ७४००) | मराठी | ०१ | (१) वय कमाल ४० वर्षे पर्यंत. मागासवर्गीय उमेदवार व मंडळातील कार्यरत कर्मचाऱ्यासाठी वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.<br>(२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किमान ५५% गुणांसह किंवा समकक्ष श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक. (शास्त्र या पदासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र यापैकी एका विषयातील पदव्युत्तर पदवी)<br>(३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षण/शिक्षणशास्त्र विषयातील पदवी (B.Ed.) किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.<br>(४) मान्यताप्राप्त प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक / महाविद्यालयीन / अध्यापक विद्यालय / अध्यापक महाविद्यालयातील अध्यापनाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>(५) किमान एका पुस्तकाचे लेखन / 'अ' दर्जाचे वृत्तपत्रात आणि संदर्भ नियतकालिकात किमान ५ लेख प्रसिद्ध केले असल्यास / शिक्षणविषयक संशोधन व पाठ्यपुस्तक लेखनाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>(६) मराठी, हिंदी व इंग्रजी लिहिता-वाचता-बोलता येणे आवश्यक. संबंधित विषयांचे मराठीतून उत्तम लेखन करता येणे आवश्यक. | अनु.जमाती-०१, वि.जा.(अ)/ भ.ज.(क)-०१, इमाव - ०१. |
| | | शास्त्र | ०१ | | |
| | | गणित | ०१ | | |
| २. | कार्यकारी संपादक (किशोर)-जनसंपर्क अधिकारी (एकाकी पद)<br>(१६०८०-५०६२० ग्रेड-पे रु. ७४००) | | ०१ | (१) वय कमाल ४० वर्षे पर्यंत. मागासवर्गीय उमेदवार व मंडळातील कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.<br>(२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला शाखेची मराठी वाङ्मय या विषयासह पदव्युत्तर पदवी किमान ५५% गुणांसह किंवा समकक्ष श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>(३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारिता विषयातील पदवी (B.J.)/पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका आवश्यक.<br>(४) मान्यताप्राप्त प्रकाशन संस्था/वृत्तपत्रे/ नियतकालिके यांमधील संपादनाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. मान्यवर बालसाहित्य/ कुमारसाहित्य प्रकाशन संस्थेतील संपादनाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>(५) मराठी, हिंदी व इंग्रजी लिहिता-वाचता-बोलता येणे आवश्यक. संबंधित विषयांचे मराठीतून उत्तम लेखन करता येणे आवश्यक. | खुला (अनारक्षित) |

दूरध्वनी : (कार्यालय) : ०२०-२५७१६१३३, २५७१६३०३ फॅक्स: ०२० - २५६५६०४६
ई-मेल आयडी : msbtssb@gmail.com Website:www.balbharati.in

**(१) वयोमर्यादा**

जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय दिनांक ३०.६.२०१४ रोजी गणले जाईल.

**(२) शुल्क**

(१) वरील सर्व पदांसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रक्कम रु.२००/- व मागासवर्गीय उमेदवारांनी रक्कम रु.१००/- इतके शुल्क बँक ऑफ महाराष्ट्रच्या कोणत्याही शाखेत खाते क्रमांक २००६२२०४७७५ मध्ये संगणकीय चलनाद्वारे भरणे आवश्यक आहे. संगणकीय चलन www.msbtssb.in या संकेतस्थळावर अर्ज भरल्यानंतर उपलब्ध होईल. उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र चलनाद्वारे शुल्क भरणे आवश्यक आहे. अर्जाच्या छाननीमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**(३) सर्व पदांकरिता** Online **पद्धतीने अर्ज भरण्याच्या समान सूचना :**

**सरळसेवा भरती प्रक्रियेचे पाच प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे आहेत.**

१) नोंदणी करणे.
२) फोटो, स्वाक्षरी व कागदपत्रे अपलोड करणे.
३) माहितीची खात्री व बँक चलन प्रिंट करणे.
४) बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत शुल्क भरून Transaction Id मिळवणे.
५) Transaction Id www.msbtssb.in वेबसाईटवर नोंदवणे आणि अर्जाची प्रिंट काढणे.

**(१) नोंदणी करणे.**

www.msbtssb.in **ही वेबसाईट कोणत्याही नवीनतम इंटरनेट ब्राउझरमध्ये ओपन करा.** होम पेजवर डाव्या बाजूला नोंदणीचा मेनू असेल. आपल्याला ज्या पदासाठी अर्ज करायचा आहे, मेनूमधील त्या पदावर क्लिक करा. त्या पदाच्या नोंदणीचे पेज दिसेल. नोंदणीच्या पेजवर सर्व माहिती इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये भरा. या पेजवर आपले संपूर्ण नाव, जन्मदिनांक, लिंग, वैवाहिक स्थिती, कायमचा व पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी, जातीचा प्रवर्ग, इत्यादी माहिती भरावी. अनिवार्य माहिती संबंधित चौकटीजवळ लाल खुणेने दर्शवण्यात आली आहे. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर सेव्ह (Save) बटण क्लिक करा.

शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या पात्रतेसाठी अर्जाची भरलेल्या माहितीच्या आधारे पडताळणी होईल. अर्हतेनुसार अर्जदार पात्र होत नसेल, तर त्याप्रमाणे संबंधित माहितीच्या उजव्या बाजूला पडताळणीबाबत मेसेज दिसेल. त्याप्रमाणे अर्जदाराने कोणत्या पदासाठी अर्ज केला आहे व अर्हता काय आहेत यांची पडताळणी करावी. एखाद्या वेळी अर्हता निवडताना चूक होऊ शकते. ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाची अर्हता पूर्ण करत नसल्यास अर्ज स्वीकारला जाणार नाही. पदाची अर्हता पूर्ण करत असलेला अर्ज स्वीकारला जाईल व त्यालाच नवीन पेजवर त्याला मिळालेला नोंदणी क्रमांक दिसेल. अर्जदाराने नोंद केलेल्या मोबाइल व ई-मेल आयडीवर नोंदणी क्रमांक व पासवर्डचा मेसेज लगेचच येईल. येथूनच आपण 'Go to photo and sign update' हे बटण क्लिक करून फोटो आणि स्वाक्षरी अपलोडसाठी जाऊ शकता. अर्जदाराच्या होम पेजवरील upload photo and sign ही लिंक क्लिक करूनही आपण फोटो आणि स्वाक्षरी अपलोडसाठी जाऊ शकता.

**(२) फोटो, स्वाक्षरी व कागदपत्रे अपलोड करण्यासाठीची कार्यपद्धती**

(१) या टप्प्यासाठी अर्जदाराचा सध्याचा फोटो, स्वाक्षरीची इमेज व कागदपत्रांच्या (PDF) फाइल्स उपलब्ध असणे आवश्यक आहे.

(२) फोटो अपलोड करण्यासाठी ३.५ सेमी X ४.५ सेमी / २०० डीपीआय आकाराचा रंगीत फोटो स्कॅन करावा. स्कॅन इमेज फोटो बॉर्डरपर्यंत क्रॉप करावा. सदर इमेज ५ के.बी ते १०० के.बी. या आकारामध्येच बसेल याची खात्री करून घ्यावी. इमेज जेपीजी फाइलमध्ये असणे आवश्यक आहे.

(३) स्वाक्षरी करण्यासाठी ४.५ सेमी X २ सेमी असा चौकोन पांढऱ्या कागदावर आखावा. त्यामध्ये **काळ्या शाईच्या** पेनने स्पष्ट स्वाक्षरी करावी. सदरची स्वाक्षरी असलेले पृष्ठ २०० डीपीआयमध्ये स्कॅन करावे आणि क्रॉप करावे. स्वाक्षरीची इमेज २ के.बी. ते ५० के.बी. या आकाराची असेल याची खात्री करा. स्वाक्षरीची इमेज जेपीजी फाइलमध्ये असणे आवश्यक आहे..

(४) फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी फोटो व स्वाक्षरी अपलोड पेजवरील तत्सम ब्राऊस (Browse) बटण क्लिक करून फाइल निवडा व अपलोड बटण क्लिक करा. फाइल अपलोड झाल्यावर फोटो व स्वाक्षरी पेजवर दिसेल.

(५) कागदपत्रे Upload करण्यासाठी तत्सम ब्राऊस (Browse) बटण क्लिक करून फाइल निवडा व Upload बटण क्लिक करा. सर्व आवश्यक कागदपत्रे Upload करा.

# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
## 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.

दूरध्वनी : (कार्यालय) : ०२०-२५७१६१३३, २५७१६३०३ फॅक्स: ०२० - २५६५६०४६

ई-मेल आयडी : msbtssb@gmail.com Website:www.balbharati.in


(६) पुढील टप्प्यावर जाण्यासाठी 'Go to Challan Print' हे बटण क्लिक करा. अर्जदाराच्या होम पेजवरील 'Challan Print' ही लिंक क्लिक करूनही आपण माहितीची खात्री व बँक चलन प्रिंट करण्यासाठी जाऊ शकता.

**(३) माहितीची खात्री व बँक चलन प्रिंट करणे.**

(१) बँक चलन प्रिंट पेजवर आपण भरलेल्या माहितीची खात्री करा. सेव्ह झालेल्या माहितीमध्ये काही बदल करायचा असेल, तर अर्जदाराच्या होम पेजवरील 'Edit' लिंक क्लिक करून बदल/दुरुस्ती करता येईल. एकदा चलन प्रिंट केल्यानंतर अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

(२) भरलेल्या माहितीच्या अचूकतेची खात्री झाल्यानंतर चलन प्रिंट बटण क्लिक करा. प्रिंट होण्यासारखा आशय (चलनाचा) स्क्रिनवर दिसेल तो A-4 आकाराच्या कागदावर प्रिंट करा.

(३) बँक चलन तीन प्रतींमध्ये दिसेल. त्यांमध्ये पहिली बँक प्रत, दुसरी अर्जदाराची प्रत व तिसरी बालभारतीची प्रत आहे. प्रिंट झालेल्या चलन प्रतींमध्ये अर्जदाराने किती फी भरायची आहे, ती माहिती नमूद करण्यात येईल. यानंतर तुम्ही लॉग आऊट होऊन पुढील टप्प्यामध्ये जाऊ शकता.

**(४) बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखेत शुल्क भरून Transaction id मिळवणे.**

वर नमूद करण्यात आलेल्या चलन प्रतीचा उपयोग करून बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित शुल्क/फीचा भरणा करा. **चलनावर निर्धारित केलेल्या जागेवर बँकेकडून ब्रँच कोड व ट्रान्झॅक्शन आयडी नमूद केला आहे याची खात्री करावी.**

**(५) Transaction id www.msbtssb.in वेबसाईटवर नोंदवणे आणि अर्जाची प्रत प्रिंट करणे.**

विहित शुल्क/फी चा भरणा केल्यावर, आपल्याला मिळालेल्या login id चा password चा वापर करून www.msbtssb.in वर login करा. अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावरील 'Update Bank Challan' या लिंकवर क्लिक करा. पुढील पेजवर चलनाची माहिती नोंदवा व 'Save' बटण क्लिक करा. 'Print Confirmation Page' बटण वापरून अर्जाच्या दोन प्रती A-4 आकाराच्या कागदावर छापून घ्या. अर्जाची एक प्रत स्वत:कडे ठेवा. **दुसरी प्रत आवश्यक कागदपत्रांबरोबर बालभारतीच्या मुख्यालयास टपालाने किंवा समक्ष पाठवा.**

**Online अर्ज भरताना उमेदवारास काही अडचणी आल्यास Help Line भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) ९४२२०५८१७३ वर सकाळी ११.०० ते ५.०० पर्यंत संपर्क साधावा.**

## अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी.

### विशेषाधिकारी पदासाठी जोडावयाच्या कागदपत्रांची यादी.

१) Online अर्जाची प्रिंट.
२) बँकेत शुल्क भरल्याची संगणकीय चलनाची प्रत.
३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राची छायाप्रत. (शास्त्र पदासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र यांपैकी एका विषयातील पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राची छायाप्रत)
४) मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षण/शिक्षणशास्त्र विषयातील पदवी (B.Ed.) प्रमाणपत्राची छायाप्रत.
५) मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/महाविद्यालयीन/अध्यापक विद्यालय/अध्यापक महाविद्यालयातील अध्यापनाचा किमान ५ वर्षांच्या अनुभवाच्या दाखल्याची छायाप्रत.
६) किमान एका पुस्तकाचे लेखन / 'अ' दर्जाच्या वृत्तपत्रात आणि संदर्भ नियतकालिकात किमान ५ लेख प्रसिद्ध केले असल्यास / शिक्षणविषयक संशोधन व पाठ्यपुस्तक लेखनाची कागदपत्रे जोडावीत.
७) अधिवास प्रमाणपत्राची छायाप्रत.
८) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.
९) दिनांक ३१.३.२०१४ पर्यंतचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची छायाप्रत.
१०) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत.
११) मान्यताप्राप्त संगणक हाताळणी/वापराबाबत शासनाने विहित केलेल्या प्रमाणपत्राची छायाप्रत.
१२) शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत.
१३) पॅन कार्ड किंवा तत्सम ओळखपत्राची छायाप्रत.
१४) नावात बदल केल्याबाबत शासन राजपत्राची छायाप्रत.

### कार्यकारी संपादक (किशोर)-जनसंपर्क अधिकारी पदासाठी जोडावयाच्या कागदपत्रांची यादी.

१) Online अर्जाची प्रिंट.
२) बँकेत शुल्क भरल्याची संगणकीय चलनाची प्रत.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.
दूरध्वनी : (कार्यालय) : ०२०-२५७१६१३३, २५७१६३०३ फॅक्स: ०२० - २५६५६०४६
ई-मेल आयडी : msbtssb@gmail.com Website:www.balbharati.in

३) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला शाखेची मराठी वाङ्मय या विषयासह पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्राची छायाप्रत.
४) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारिता विषयातील पदवी (B.J.) /पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्राची छायाप्रत.
५) मान्यताप्राप्त प्रकाशन संस्था/वृत्तपत्रे/नियतकालिके यांमधील संपादनाच्या कामाच्या अनुभवाच्या दाखल्याची छायाप्रत. मान्यवर बालसाहित्य/कुमारसाहित्य प्रकाशन संस्थेतील संपादनाच्या अनुभवाच्या दाखल्याची छायाप्रत.
६) अधिवास प्रमाणपत्राची छायाप्रत.
७) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.
८) दिनांक ३१.३.२०१४ पर्यंतचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची छायाप्रत.
९) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत.
१०) मान्यताप्राप्त संगणक हाताळणी/वापराबाबत शासनाने विहित केलेल्या प्रमाणपत्राची छायाप्रत.
११) शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत.
१२) पॅन कार्ड किंवा तत्सम ओळखपत्राची छायाप्रत.
१३) नावात बदल केल्याबाबत शासन राजपत्राची छायाप्रत.

**(४) महत्त्वाच्या सूचना**

(१) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

(२) वेबसाईटवर भरलेल्या अर्जासोबत बँकेचे चलन, शैक्षणिक पात्रता व अनुभव यांबाबतच्या प्रमाणपत्रांच्या प्रती अपलोड कराव्यात व त्याच्या प्रमाणित प्रती लिखित साहित्यासोबत दिनांक २१.७.२०१४ पर्यंत या कार्यालयाच्या पत्त्यावर समक्ष/पोस्टाने पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

(३) अर्जाचे शुल्क न भरल्यास उमेदवार अपात्र ठरवण्यात येईल.

(४) Online अर्ज भरण्याची शेवटची तारीख १६.७.२०१४ पर्यंत राहील. अर्जाचे शुल्क बँकेत भरण्याची व बँकेत फी भरण्याची नोंदणी वेबसाईटवर करण्याची अंतिम तारीख १७.७.२०१४ पर्यंत राहील.

(५) उपरोक्त पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेस/मुलाखतीस बोलावण्याबाबतचे पत्र त्यांनी ऑनलाइन पद्धतीने डाउनलोड करून घ्यायचे आहे. याबाबतची सूचना वेळोवेळी एसएमएस व ई-मेलद्वारे कळवण्यात येईल. या कार्यालयामार्फत या संदर्भात पत्र पाठवण्यात येणार नाही.

(६) उमेदवारांनी लेखी परिक्षेस/मुलाखतीस येताना मूळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकित प्रत यांसह प्रत्यक्ष मुलाखत सुरू होण्यापूर्वी उपस्थित रहावे.

(७) विशेषाधिकारी पदाकरिता उमेदवाराचे लेखन/संपादन, संबंधित विषयाचे ज्ञान, संगणक ज्ञान यांवर आधारित स्वतंत्र लेखी परीक्षा घेण्यात येईल आणि कार्यकारी संपादक (किशोर)-जनसंपर्क अधिकारी पदाकरिता लेखन/संपादन, संबंधित विषयाचे ज्ञान, संगणक ज्ञान व जनसंपर्क यांवर आधारित स्वतंत्र लेखी परीक्षा घेण्यात येईल.

(८) उमेदवाराचे राष्ट्रीयत्व, भारतीय व तो महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) धारण करणे आवश्यक, तथापि महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक मकसि-१००७/प्र.क्र.३६/कार्या-३६, दिनांक १० जुलै २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या ८६५ गावांतील, १५ वर्षांपासून रहिवासी असल्याचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे आवश्यक आहे.

(९) महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र. क्र. १७/२०००/१२ दिनांक १.७.२००५ नुसार दिनांक २८.३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार केला जाणार नाही. तसे विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापत्राचा नमुना www.msbtssb.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(१०) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जमाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ सन (२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक : ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्त्व वि.जा.अ, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., इ.मा.व. अणि वि.मा.प्र. यांना लागू आहे. या प्रवर्गांतील उमेदवारांनी ते उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे ३१ मार्च २०१४ पर्यंतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(११) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभागाकडील, शासन निर्णय, क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब, दिनांक १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४.**
दूरध्वनी : (कार्यालय) : ०२०-२५७१६१३३, २५७१६३०३ फॅक्स: ०२० - २५६५६०४६
ई-मेल आयडी : msbtssb@gmail.com Website:www.balbharati.in

याचिकांवर मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपीमधील आदेशाच्या अधीन राहून, नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून **सहा** महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल. तद्नंतर त्या पदावर उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही.

(१२) शासन निर्णय क्रमांक माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शा.नि.क्र. मातस २०१२/प्र. क्र. २७७/३९ दिनांक ४.२.२०१३ अन्वये शासनाने विहित केलेले संगणक अभ्यासक्रम / माहिती तंत्रज्ञानविषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना पात्र समजण्यात येईल. इतर उमेदवारांनी शासन धोरणानुसार मान्यताप्राप्त संस्थेतून संगणक हाताळणी/वापराबाबत शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत प्राप्त करून सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

(१३) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व मुलाखतीच्या वेळी दिलेली माहिती / खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

(१४) एखाद्या उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाब आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

(१५) या संदर्भात उद्भवणारे न्यायालयीन दावे पुणे जिल्हा न्यायालयाच्या कार्यकक्षेत राहतील.

(१६) ज्या उमेदवारांनी यापूर्वी मंडळाकडे नोकरीसाठी अर्ज सादर केले असतील त्यांच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. संबंधित उमेदवारांनी निर्धारित पद्धतीने व विहित मुदतीत Online पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

(१७) शासकीय/निमशासकीय/मंडळ सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याने आपला अर्ज कार्यालय प्रमुखांची परवानगी घेऊन निर्धारित पद्धतीने व विहित मुदतीत सादर करावा.

(१८) सदरची निवड सरळसेवा भरती प्रक्रियेने करण्यात येत असल्यामुळे उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत असल्यास पूर्वीच्या सेवेचा कालावधी व वेतन कोणत्याही कारणासाठी ग्राह्य धरले जाणार नाही.

(१९) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्याचा नोंदणी क्रमांक व दिनांक अर्जामध्ये नमूद करावा.

(२०) मुलाखतीच्या वेळी आवश्यक असेल तशी उमेदवारांच्या प्रकरणनिहाय खालील कागदपत्रे तपासणी समितीकडून तपासली जातील.
(१) नावात बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र
(२) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (विवाहित व घटस्फोटित उमेदवारांसाठी)
(३) लेखन, संपादन कामाचा तपशील

(२१) नियुक्त झालेल्या उमेदवारास पाठ्यपुस्तक मंडळ कर्मचारी सेवानियमावली १९६७ व तद्नंतर वेळोवेळी केलेल्या दुरुस्त्यांसह त्यांतील सर्व सेवाशर्ती बंधनकारक राहतील.

(२२) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी / मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

(२३) पदांचा प्रकार व पदांची संख्या यांत बदल करणे, लेखी परीक्षा/मुलाखत स्थगित करणे वा रद्द करणे, अंशत: बदल करणे इत्यादींबाबतचे सर्व अधिकार पाठ्यपुस्तक मंडळास राहतील.

**विशेष सूचना : सदरहू भरती प्रक्रियेसाठी राज्यातील कोणत्याही कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अशासकीय व्यक्ती यांपैकी कोणाचीही अभिकर्ता/माध्यम म्हणून नियुक्ती केलेली नाही. नोकरीस लावून देतो असे सांगून फसवणूक करणाऱ्यांपासून तसेच तोतयागिरीपासून अर्जदाराने सावध राहावे. असा प्रकार निदर्शनास आल्यास वरील पत्त्यावर कळवण्यात यावे. सदर भरती प्रक्रियेसाठी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.**

**स्थळ : पुणे** **संचालक,**
**दिनांक : १.७.२०१४** **पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ४.**